## प्रकरण पहिले

# चारुता सागर यांच्या ग्रामीण कथा : स्वरूप आणि वैशिष्ट्ये

# प्रकरण पहिले

# चारुता सागर यांच्या ग्रामीण कथा : स्वरूप आणि वैशिष्ट्ये

**प्रास्ताविक :-**

चारुता सागर यांच्या कथासंग्रहामधील स्त्री जीवनाचा चिकित्सक अभ्यास करणे हा प्रस्तुत लघुप्रबंधाचा उद्देश आहे. हा अभ्यास करण्यासाठी प्रथमत: चारुता सागरांच्या ग्रामीण कथेचे स्वरूप आणि वैशिष्ट्ये पाहणे आगत्याचे ठरते.

चारुता सागर यांची कथा ग्रामीण बोली भाषेत प्रकटते. गामीण समाज, संस्कृती आणि व्यक्ती हाच त्यांच्या कथालेखनाचा विषय बनला आहे. चारुता सागर यांची कथा खेड्यापाड्यातील नात्यागोत्यांचे, त्यांच्या संबंधाचे, या संबंधातून निर्माण होणाऱ्या ताणतणावाचे चित्रण करतात. चारुता सागरांनी वय वर्षे १४ ते २६ या कालावधीत अखंड भारत पायी पालथा घातला. या भ्रमंतीतून त्यांना विविध अनुभव आले. हरतऱ्हेची माणसे भेटली. भारतीय स्त्रीजीवन जवळून पाहता आले. या भ्रमंतीत भेटलेल्या स्त्रियांचे दु:ख त्यांच्या सहवासातून आलेले अनुभव हेच त्यांच्या कथांचे विषय होतात.

चारुता सागरांनी दलित व भटक्या जीवनाचे केलेले चित्रण हे मानवतावादी दृष्टीने केलेले आहे व ते अधिक कलात्मक ही आहे. त्यांच्या कथेने ग्रामीण कथा आणि दलित कथा या सीमारेषा पुसून टाकण्याचे काम केले आहे. या कथांची मांडणी करताना त्यांनी स्वतंत्र भाषाशैलीचा वापर केला आहे. त्याचबरोबर कथा रचनेच्या तंत्रात देखील नवीन प्रयोग केलेले दिसतात. यासाठी त्यांनी कथा लिहिताना तिची रचना ही कलात्मक केल्याचे जाणवते. यामुळे त्यांची कथा अस्सल व काळातीत आहे हे काळातीतपण लक्षात घेणे फार महत्वाचे आहे. याबाबत वैजनाथ महाजन म्हणतात ,

" उण्यापुऱ्या पंचेचाळीसच्याच आसपास पोचणाऱ्या कथातून हे साध्य करणे हे म्हणजे खरे वाड्मयीन महात्मनेचेच आव्हान म्हटले पाहिजे. चारुता सागर नावाच्या लेखक नामाने ते स्वीकारले आणि भोसले गुरूजी नामाने ते तितक्याच बळाने पेलून दाखवले. मराठी कथेत हे नाव अधोरेखित आहे. अल्पाक्षरी पण बहुगुणी लेखकाची मराठी गद्यात एक फार लक्षवेधी अशी उजळती परंपरा आहे. त्या परंपरेला आणखी बुलंद करणारा हा एक त्याच्या अशा सर्वस्वी

वेगळ्या खानदानाचा लेखक त्याच्या कथाकार्याने आपणास समृद्ध बनवले आहे आणि मराठी कथा साहित्याचा जास्वंद फुलत ठेवला आहे हे संचित अपार सुखावणारे असेच आहे." [१]

चारुता सागरांनी जिवनातील विविध अनुभव घेतले आहेत. या आपल्या जगण्याचे लिहिणे करणाऱ्या चारुता सागर यांच्या कथेचे ग्रामीण स्वरूप कसे आहे ते आता आपण पाहू.

## सैनिकी जीवनावरील कथा -

चारुता सागरांचा कथालेखनाचा पिंड हा स्वतंत्र मनोवृत्तीचा आहे. यातूनच त्यांनी सैनिकी जीवनावर कथा लिहिण्याची वेगळी वाट शोधली. त्यांचा सैनिकी जीवनाशी संबंध आला यातूनच त्यांची 'रंगरूट', 'पूल', 'आंघोळ', 'हॉलिडे होम', 'निरोप' इ. कथांचा जन्म झाला.

चारुता सागरांना बालपणापासून सैनिकी जीवनाबद्दल ओढ होती याचे प्रत्यंतर 'रंगरूट' या कथेमध्ये येते. २४ मैलाचे अंतर तोडून एका भल्या पहाटे रेल्वे स्टेशन गाठलं व मित्रमंडळीसमवेत गोऱ्या साहेबांपुढे उभे राहिले परंतु तुम्ही अजून लहान आहात म्हणून साहेबाने वारंट बनवून घरी पाठवले.

दरम्यान देश स्वतंत्र झाला. त्यात पाकनं काश्मीरवर हल्ला केला. सैन्यभरती जोरात चालू होती. चारुता सागर सैन्यात दाखल झाले. या ठिकाणी पंजाबी, रजपूत, मद्रासी, जाट इ. जवानांची ओळख झाली. त्यांच्याशी जवळचा संबंध आला याच संघर्षमय, एकाकी, उदासवाण्या ठिकाणी त्यांना अनेक कथा बीजे मिळाल्याचे जाणवते.

' पूल ' कथेतील शत्रूसैनिक थंडीमुळे मरणाच्या दारात उभा होता. त्याच्याकडे शस्त्रास्त्रे होती, दारूगोळा होता पण; जगायला अन्न नव्हते, अंगात उब नव्हती, केवळ सिगरेट तरी मिळावी, रम तरी मिळावी म्हणून तो शरण आला होता. मानवी मनातील अहंकार, अभिमान, शत्रुत्व हे सर्व निसर्गापुढे कसे तुच्छ ठरू शकते हाच या कथेचा विषय आहे.

मृत्यूच्या सरहद्दीवर तळ ठोकून वरिष्ठांच्या इशाऱ्यानुसार प्रसंगी जीवही झोकून देण्यास सिद्ध असणाऱ्या सैनिकांची 'आंघोळ' ही कथा. सैनिकांच्या जीवनात लष्करी कवायतीचे, संचलनाचे अथवा युद्धाचे प्रसंग नित्याचेच असतात; पण; असे क्षण संपल्यानंतर सैनिकांचे मन व शरीर स्वस्थ बसत नाही. जरी निष्पाप सुसंस्कृत सैनिक असला तरी त्याची कामवासना त्याला अस्वस्थ करते. यावर उपाय म्हणून त्यांनी स्वीकारलेल्या समलिंगी संभोगाचे

कलात्मक तटस्थ चित्रण चारुता सागरांनी केले आहे. ' हॉलिडे होम ' या कथेमध्ये सैनिकांच्या मनातील अस्वस्थ काम वासना व ती पुरी करण्यासाठी दौलतसिंगने पत्नीला भेटायला जाण्यासाठी केलेला प्रयत्न, पत्रे टाकताना घेतलेली काळजी, यातून त्याची अतृप्त कामवासना दिसून येते. इतके करूनही घरी आल्यावर पत्नीला बाजेवर पाहून तो मनात म्हणतो, " असू दे सहावा, नाहीतर पाचवा. पण सुट्टी वाया घालवायची नाही ." [२]

' कवेत आलीच बाई, तिला फोडून खाईन!' हे दौलतसिंगचे वक्तव्य त्यांच्या अतृप्त कामवासनेचा हुंकार आहे.

' असेही दिवस ' मधील गोविंदन हा केरळी तरूण. नेहमी एकाकी आणि उदास. त्यात पट्टीचा चेनस्मोकर. त्यान आपली कहाणी सांगितली ती अशी -

" मी कळता व्हायच्या आत बाप मेला आणि कळता झाल्यावर आईनं दुसर लग्न केले. वास्तविक पाहता तिनं घरात नवी सून आणून संसार करायला हवा होता. पण तिनं तसं काही न करता दुसरं लग्न करून स्वत:चाच संसार उभारला. आणि मला परकं केलं. कुठं काही लक्ष लागेना. मग आलो झालं फौजेत. " [३]

आणि दुसरा जगदंब अहिर जातीचा तरूण. जेव्हा पत्नीचा व तिच्या याराचे बेमालूम निकाल लावतो तेव्हाच शांत होतो. अशी निराश झालेली मने, भंगलेल्या व एकाकी झालेल्या तरूण सैनिक मनाच्या दु:खी अंत:करणाचा शोध घेणे हेच चारुता सागरांच्या कथेचे विषय आहेत.

चारुता सागरांनी सैनिकी जीवनातील बारकावे, तेथील वातावरण, त्यांची भाषाशैली, अतृप्त कामवासना, उदास एकाकी जीवन यातून निर्माण होणारे दारूचे व्यसन, देशासाठी, सहकाऱ्यासाठी प्रसंगी प्राणत्याग करण्याची तयारी, सैनिकांच्या स्वभावाचे बारकावे व सैनिकी शिस्त यांचा अचूक वेध आपल्या कथांमधून घेतला आहे.

## भटकंती करणाऱ्या लोकांच्या जीवनावरील कथा -

चारुता सागरांनी अखंड भ्रमंती केलेली आहे. या भ्रमंतीत त्यांना भटक्या लोकांचे जीवन देखील जवळून पाहता आले तसेच लोणारवाडी येथील शाळेमध्ये शिक्षकाचे काम करीत असताना अनेक भटकंती करणारे लोक शाळेजवळच तळ ठोकीत. त्यामुळे त्यांच्या जीवनाचे बारकावे त्यांच्या कथेमध्ये दिसतात. याबाबत अविनाश टिळक म्हणतात, " त्यांच्या कथा दलित,

शोषित, पीडित माणसाचे एक अनोखे जग वाचकांसमोर उभे करतात. साधू, बैरागी, जोगती, पारधी, वैदू, डोंबारी, गारूडी आदि सहसा दखल न घेतल्या जाणाऱ्या माणसांची दु:खे ते आपल्या कथांमधून साकार करतात. त्यांच्या कथांचे सामर्थ्य त्यांच्या एका तपाच्या लोकविलक्षण भटकंतीत त्यांना जे अनुभव आले, मानवी व्यवहारांची जी प्रचिती आली त्यामध्ये आहे." [४]

'निवाडा' ही नंदीवाल्याच्या जीवनावर आधारित कथा. या कथेतून नंदीवाल्यांची जातिव्यवस्था, तिचे नियम, जातपंचायतीचे दर्शन चारुता सागरांनी घडविले आहे. प्रेमकथा हे या कथेचे स्वरूप नाही व तो तिचा परिणाम नाही. प्रेम करणे ही कल्पनाच नंदीवाले समाजात अगदी हास्यास्पद आहे. नंदीवाल्या जमातीतील लोकांचा नियम असा - " धर्मानं वागणारी जात, कधी कुणाची चोरी नाही, लांडी-लबाडी नाही, कपट नाही, धर्मानं मिळेल ते खायचं, आहे त्यात समधान मानायचं, पण इमान ढळायचं नाही. जातीचा रिवाज मोडायचा नाही. तरण्याबांड पोरी. एकट्या दुकट्या दिवसभर गावा शिवारात भटकतील, भिक्षा मागतील आणि संध्याकाळी धड कासोट्यानं पालाला येतील. जमातीतल्या जमातीत एखादी बाई घसरणार नाही. नवरा नको असला तर सोडून देईल आणि चक्क दुसरं लगीन करील, पण ज्याच्या नावानं कुंकू लेईल त्याच्या पालात राहील." [५]

अशा प्रकारची कडक जातिव्यवस्था असणाऱ्या भटकंती करणाऱ्या नंदीवाल्या समाजाचे दर्शन घडवणे हे चारुता सागरांच्या कथेचे स्वरूप आहे.

अशा प्रकारची कडक जातिव्यवस्था 'रैतुना' कथेतील भटकंती करणाऱ्या रोहिल्यांच्या जमातीत देखील दिसून येते. रोहिल्यांच्या मुलीच्या पोटी लग्नाअगोदर गर्भ वाढला. त्याबद्दल तिला कडक शारीरिक शिक्षा केली जाते व शेवटी जातीतून बहिष्कृत केले जाते.

एखादे प्रेम कितीही नि:स्वार्थी, अस्सल, उदात्त असले तरी ते जर परस्त्रीवरचे प्रेम असेल तर जगातल्या कोणत्याही संस्कृतीने निंद्य ठरविले आहे. याची जाणीव चारुता सागरांच्या या कथा अभ्यासाअंती जाणवते.

'वाट' ही फासेपारधी समाजातील कोवळ्या भावनेची एक चित्तरकथा. म्हाताऱ्या आईचा मुलीच्या भेटीत जीव अडकला आहे. देहात त्राण नाही. मुलीला भेटून दोन-बारा वर्ष झाली. सांगावा धाडला पण अंतर मोठे. ठावठिकाणा माहित नाही. ती आईला भेटायला निघते. पायी मुलूख तुडवत. अन्न नाही, पाणी नाही, तरी ही ती चालत राहते. दंडोबाच्या माळावर पोहोचते. पण आई भेटत नाही. पाले जागा सोडून गेलेली. दिसतो फक्त झाकलेला खड्डा. माय-

लेकीच्या स्निग्ध मायेची ही भाव-कथा. ती मांडत असताना भटक्या लोकांच्या जीवनात येणाऱ्या अडचणी, सांगावा देण्याची पद्धत जगण्यासाठी होणारी फरफट, प्रस्थापित समाजाचा त्याच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन, उत्कष्ट प्रेमभावना, नात्याची ओढ, त्याचे राहणीमान, अस्थिर जीवन याचाही सखोल अशा बारकाव्याने चारुता सागरांनी परामर्श घेतल्याचे दिसून येते.

'ढोलगं' ही खास ग्रामीण प्रेमकथा असली तरी ती डोंबारी समाजातील खेळाचे, खेळाच्या साहित्याचे, त्यांच्या शारीरिक कसरतीचे दर्शन घडविणारी कथा आहे. या कथेतून त्यांचे लग्न व्यवहार, डोंबारी समाजाच्या चाली-रीती, प्रथा याचेही चित्रण चारुता सागरांनी सूक्ष्म निरीक्षणातून मांडले आहे.

'पुंगी' ही सापगारूड्यांच्या जीवनावरील खला आणि आलीखां यांची शोकात्मक कथा. साप पकडताना आलीखला मृत्यू येतो. खला एकाकी पडते. आपल्या नवऱ्याला डसणाऱ्या सापाला तिला जतन करावे लागते; कारण तोच तिच्या मुला-बाळांच्या जीवनाचा आधार आहे. हा कथेचा विषय. याची मांडणी करीत असताना गारूड्याचे जीवन, साप पकडण्याची पद्धती, गारूड्यांचे धाडस याचे ही वर्णन अत्यंत बारकाव्याने चारुता सागरांनी केले आहे.

नंदीवाले, रोहिले, फासेपारधी, डोंबारी, सापगारूडी इ. लोकांच्या जीवनावरील चारुता सागरांच्या कथा लेखनाबाबत महावीर जोंधळे म्हणतात -

" ज्या जाती-पातीची ओळख नाही, त्यांचे जगणे माहित नाही अशा अनोळखी जगाच्या पालात घुसून तेथील समाज वास्तवाला आपलंसं मानणारा लेखक म्हणून चारुता सागर यांच्याकडे बघणे क्रमप्राप्त आहे. ज्या काळात पाटील, देशमुख व गावगाड्यातील विषयांवर आधारित लेखन करून त्यांचे भांडवल करीत होते. त्याच काळात सैन्यातून परत आल्यानंतर पंधरा-वीस वर्ष भटक्या विमुक्तासारखे भटकत राहून पालातील, पालाबाहेरील, वाकळातील, वाकळाबाहेरील, शेतातील किंवा गाढवावर संसार मांडून भटकत राहणाऱ्या समाज जीवनाचा अभ्यास करणाऱ्या चारुता सागर यांना सापडलेला समाज हा इतर वाङ्मयकारांना सापडला नाही असे म्हणावे लागेल. गारूडी, गोंधळी किंवा कैकाडी या वर्गात मोडणारा आणि ज्याला जातीपातीचे लेबल नाही असा एक वर्ग पोटासाठी काबाडकष्ट करीत, आभाळ अंगावर घेत आणि उशाला दगड घेऊन रानोमाळ फिरत राहिला त्यांचे विश्व, त्यांचे दु:ख, त्यांचे सुख, त्यांचे व्यवहार व जगण्याचा कल्लोळ एकत्र करून लेखन करीत राहिला म्हणून इतर लेखकापेक्षा हा लेखक अधिक सरस ठरतो. " [६]

## शिक्षकी जीवनावरील  कथा -

चारुता सागरांनी शिक्षकीपेशाचाही अनुभव घेतला आहे. शैक्षणिक क्षेत्रातील बरे वाईट अनुभव, शाळेतील मुले यांच्याशी त्यांचा जवळचा संबंध आला. याच अनुभवावर ग्रामीण भागातील शिक्षकांच्या जीवनावर 'कुठं वाच्यता नसावी', 'न लिहलेल पत्र', 'सावित्री', इ. कथा लिहिल्या आहेत.

'कुठं वाच्यता नसावी' या कथेतील केशव विष्णू तळपदे हा एक अतिशय प्रामाणिक शिक्षक. बऱ्हाळीत शाळा नव्हती. मुले गोळा केली. शाळा सुरू झाली. सरकारी अधिकाऱ्याने तपासणी केली. शाळेला ग्रँट मंजूर झाली. पण ती मिळवण्यासाठी साहेबाने शंभर रूपये वसूल केले.

प्रामाणिकपणे ज्ञानदानाचे काम करणाऱ्या शिक्षकाला लाच द्यावी लागते. या घटनेमुळे व आईकडून मिळालेल्या वागणुकीने शिक्षकाचा भावनिक कोंडमारा होतो याचे वर्णन चारुता सागरांनी केले आहे. सरकारी कामातील गोंधळामुळे सर्वसामान्य माणसाची गळचेपी कशी होते यावर प्रकाश टाकण्याचे काम या कथेत केले आहे.

' न लिहिलेल पत्र ' या कथेतील शिक्षक सुद्धा मुलांना घडविण्यासाठी अतिशय कष्ट घेतात. त्यांना वळण लावतात. कृष्णासारखा अतिशय गरीब मुलगा शिक्षकांचा आवडता विद्यार्थी होतो. कृष्णा पहिलीच्या वर्गात तीन वर्षे आहे; पण त्याला लिहिता वाचता येत नाही ही गोष्ट शिक्षकांच्या लक्षात येताच त्याला जवळ घेतात व त्याच्या पाठीवर हात ठेवून म्हणतात, " कृष्णा, ही पाटी घे. मी दोन अक्षरं देतो ती उद्या घटवून ये. म्हण, 'ग व त', अन् ह्या एका पैशाची पेन्सिल पण तुला आण." [७]

या त्यांच्या उद्‌गारातून मुलांच्या शिक्षणाबद्दल असणारी आत्मियता दिसून येते. दरम्यान तीन वर्षे निघून गेली आणि सदरची शाळा जिल्हा स्कूल बोर्डाने आपल्या ताब्यात घेतली व नियमाप्रमाणे दुसऱ्या शिक्षकाची नेमणूक केली.

प्रामाणिकपणे अतिशय कष्टाने, जिद्दीने ज्यांनी शाळा फुलवली त्यांच्या पदरी शाळा सोडून जाण्याची वेळ शिक्षण खात्याने आणली असा भावनिक कोंडमारा झालेल्या शिक्षकाची व्यथा हा या कथेचा विषय आहे.

' सावित्री ' या कथेतील शिक्षकदेखील गावातील लोकांना मदत करणारा, त्यांची पत्रे लिहून-वाचून दाखवणारा, त्यांच्या अडचणीला उभा राहणारा आहे. गावचा तो आधार बनतो. विहिरीत पडलेल्या सावित्रीला वाचवतो. तेव्हा गणूनाना म्हणतो, " मास्तर गडी भला माणूस. दुपारचं गावात कुणी गडी माणूस नसलं तरी गावची राखण करतोय. न्हाईतर आज ती होती का ?" [८]

यावरून शिक्षकाला समाजात असणारा मान, त्याच्या जवळची सोशिकता, सहनशीलता, समाजासाठी सत्कार्य करण्याची त्यांची वृत्ती इ. गोष्टींचे दर्शन वरील कथांमधून चारुता सागरांनी घडविले आहे.

## भूकेची वेदना मांडणाऱ्या कथा -

मानवाच्या मूलभूत गरजांपैकी ' अन्न ' ही मानवाची प्रथम गरज आहे. तिची पूर्तता करण्यासाठीच जगातील साऱ्या उलाढाली सुरू आहेत. अन्न न मिळाल्याने खरे हाल होतात ते मुलांचे. याचे चित्रण चारुता सागरांनी 'बुद्धवाड्यातील भूक', 'भूक' 'वर्दी ' इ. कथामधून केले आहे.

'बुद्धवाड्यातील भूक' या कथेमध्ये सर्वच महारांनी बुद्ध झाल्यापासून गावकीचे काम सोडले आणि मिळेल ती मोलमजूरी करू लागले परंतु काम क्वचितच मिळे त्यामुळे परसाच्या कुटुंबावर उपासमारीची वेळ आली. पोरं आईला आपली भकाळी गेलेली पोटं दाखवू लागली. कुत्र्याला टाकावा म्हटलं तरी तुकडा शिल्लक राहिला नाही.

परसाची द्विधा अवस्था झाली. आपल्या मुलांसाठी जनावर ओढून टाकायचं का समाजात राहण्यासाठी जातीचा नियम पाळायचा. तो मुलांसाठी शेवटी जनावरं ओढून टाकतो, परंतु अन्नाचा घास मात्र त्याचे भाऊबंद त्याच्या मुलाबाळांच्या तोंडात पडू देत नाहीत.

सतत पावसामुळे ' भूक ' कथेतील बाबाजी व धनव्वाला काम मिळेना त्यामुळे त्यांच्या मुलांची उपासमार होऊ लागली. भूकेने वखवखलेली मुले आईची उघडी पाठ चाटू लागली. खारट पाठ चवदार लागताच मुलांनी दात घट्ट रोवले.

मुलांसाठी ती अनेक ठिकाणी फिरून आली, पण तिला कोणी अन्नाचा कण दिला नाही. शेवटी इमाने-इतबारे वागणारा बाबाजी मुलांसाठी चोरी करायला जातो, पण तो चोरी करताना पकडला जातो.

दारिद्र्य, सततचा पाऊस, सामाजिक नितीनियम यामुळे मुलांच्या पोटाचे होणारे हाल, त्यासाठी आई-बापांना करावा लागणारा संघर्ष व त्यातून येणारा सामाजिक रोष वरील कथातून चारुता सागरांनी मांडला आहे.

' वर्दी ' ही सत्याप्पा व बन्या या पोटासाठी प्रेतांची विल्हेवाट लावणाऱ्या दोन जीवांची कथा. कोठून वर्दी आली की नारायण टेलरने त्यांना निरोप द्यायचा.दोघांनी मिळून प्रेत पुरायचे. त्या बदल्यात मिळालेल्या पाच रूपयात शंकरव्वाच्या हॉटेलात चहा-भजी खायची.

पोटासाठी दुसऱ्याची प्रेते उचलता उचलता एक दिवस बन्याचा मृत्यू होतो ही गोष्ट मालकाला सांगताना सत्याप्पा म्हणतो, -

" कशानं सांगू ? कशानं बोलू ? रात्री निजलेला. सकाळी उठून बघतोय, तर गार,गार, थंड गार. मान मुरगाळून पडलेला. पोटात वीतभर डबरं. दोन-तीन दिवस झालं, अन्नाचा कण नाही. पोट हापाळी हापाळी. पाठी पोटी एक झालेलं. चार दिवसं पाऊस अंगावर घेतला, एवढचं झालं. "[९]

पोटाच्या खळगीत काही तरी केव्हा तरी मिळेल तेव्हा ढकलावे हे ज्याचे ध्येय आहे अशांचे चित्रण चारुता सागरांनी केले आहे. ज्यांना कदाचित वासना असतील पण स्वप्नातही परिवार असणे शक्य नाही. अशा शहरात राहणाऱ्या जीवाची ही कहाणी आहे. त्या व्यक्तीसारखीच भयंकर किळसवाणी ; पण सत्य असणारी कथा मांडली आहे.

## नैसर्गिक समस्या मांडणाऱ्या कथा -

ग्रामीण जीवनामध्ये लोकांना दुष्काळ, रोगराई, पूर इ. नैसर्गिक समस्यांना तोंड द्यावे लागते. या समस्यांमुळे अनेकांचे संसार उध्वस्त होतात. यामध्य संसारगाड्यात पाळलेले प्राणी सुटत नाहीत. चारुता सागरांनी ' दावं ', ' म्हस ', ' पूर ', ' अवर्षण ' या कथातून नैसर्गिक समस्यांमुळे निर्माण होणाऱ्या परिस्थितीमुळे मानवाचे व प्राण्यांचे कसे हाल होतात हा विषय मांडला आहे.

' दावं ' या कथेमध्ये दुष्काळामुळे बळी व हीराला बैलांना जगवणे कठीण जाते. बैलांच्या वैरणीसाठी हीरा गळ्यातील डोरलं देखील मोडते. सारे उपाय थकतात. तेव्हा सरकारने जनावरांसाठी काढलेल्या छावणीत बैलांना ठेवण्याचा निर्णय घेतात; परंतु छावणीत जाईपर्यंत वाटेतच जनावरांचा मृत्यू होतो. असा मनाला चटका लावणारा कथेचा विषय असला

तरी यातून ग्रामीण भागातील लोकांचे प्राण्यावरील प्रेम, त्यांना सांभाळण्यासाठी घेतले जाणारे कष्ट व प्रसंगी सौभाग्यलंकारापेक्षाही जीवापाड प्राण्यावर प्रेम करणारी माणसे चारुता सागरांनी साकारली आहेत.

गोठ्यातील मुक्या जनावरांबद्दल अपार प्रेम बाळगणाऱ्या सामान्य स्त्री ची 'म्हस' ही कथा. जेमतेम जीवमात्र धारण करणारी म्हस दावणीला असते. ती आपल्या लेकीला रामोशाच्या काशीबरोबर म्हैस चारण्यासाठी पाठवू लागते. म्हैस धष्टपुष्ट होते. दुध देऊ लागते; परंतु थोड्याच दिवसात काशीच लग्नं झाल त्यामुळे आईन म्हशीचं दावं-खुंटा एक केला. गावात फऱ्या रोग आला आणि त्याची लागण म्हशीला झाली. यातच म्हशीचा मृत्यू झाला. हा कथेचा विषय. परंतु ग्रामीण स्त्री आपल्या म्हशीला म्हारांच्या ताब्यात देत नाही. ती आपल्या शेताच्या बांधावरच घाला असा हट्ट धरते. यातून मूक प्राण्याबद्दल तिच्या मनात असणारा कृतज्ञता भाव दिसून येतो.

नैसर्गिक आपत्तीतही मुक प्राण्यावर प्रेम करणाऱ्या लोकांचे चित्रण चारुता सागरांनी केले आहे.

' पूर ' कथेतील येसी जनावरांना हिंडायला घेऊन जाते. मोठ्या पावसाने नदीला पूर येतो. त्यामुळे तिला गावाकडे जाता येईना. ती धाडसाने पाण्यात जनावरांसह गेली ; परंतु पुराच्या पाण्याने ती वाहून जाते. हा कथेचा विषय. यातून चारुता सागरांनी येसीचे जनावरील प्रेम, तिचा धाडसीपणा व त्यातून तिच्यावर येणारे संकट याचे वर्णन केले आहे.

दुष्काळामुळे होणारे माणसांचे व जनावरांचे हाल ' अवर्षण ' या कथेत मांडले आहे. पाऊस पडावा म्हणून लोकांनी देवाला घातलेले साकडे व यातून पांडूबाचा अंधश्रद्धेतून गेलेला बळी याचे चित्रण आले आहे.

## सर्पाशी संबधीत कथा -

ग्रामीण भागातील लोकांचा व्यवसाय शेतीशी निगडीत असतो. शेतामध्ये काम करताना किंवा खेडेगावात अडचणीच्या जागाही मोठ्या प्रमाणात आढळतात. या ठिकाणी साप हा प्राणी आश्रयाला येतो. कधी कधी हे सर्प मानवाच्या दृष्टीस पडतात तर कधी चावाही घेतात. यात माणसाचा मृत्यू होतो त्यामुळे लोकांच्या मनात या प्राण्याबद्दल भीती आणि उत्सुकता निर्माण झाली आहे.

' सोबती ' या कथेमधील मास्तर नोकरीसाठी खेड्यात रहायला गेले, परंतु गावात रहायला जागा नव्हती. एका दुर्लक्षित घरात त्यांनी आसरा घेतला प्रंतु या घरात मोठा साप असल्याने त्या मालकाने घर सोडून रानात वस्ती केलेली. सुरूवातीला मास्तरांनी सापाला मारण्याचा प्रयत्न केला परंतु नंतर त्यांनी सापाची असह्य अवस्था ओळखून त्याच्याशी मैत्री केली व गावातील लोकांच्या मनात सापाबद्दल असणारी भीती दूर केली.

चारुता सागरांनी या कथेतून ग्रामीण भागातील लोकांच्यामध्ये सापाबद्दल असणाऱ्या अंधश्रद्धा, सापाबद्दलच्या विविध भीतिदायक कथा व ग्रामीण लोकांच्या मनात असणारी भीती दूर करण्याचा प्रयत्न केला आहे.

' गर्भगंध ' या कथेमध्ये नाग-नागीणीच्या प्रणयराधनेचे चित्रण मांडले आहे. नागीणीच्या गर्भगंधाने धुंदावलेला नाग. नागीणीचे आढेवेढे आणि शेवटी मधुमिलनात गुंतलेले दोन जीव. हा या कथेचा विषय; परंतु यातून माणसाच्या आणि प्राण्यांच्या मिलनाच्या ओढीतील साम्याचे दर्शन चारुता सागरांनी घडविले आहे.

साप डूक धरतो या लोकसमजावर आधारलेली ' नागीण ' ही कथा. बापू शेतामध्ये बेधुंद झालेल्या जुळ्यातील नागाला मारतो, नागीण पसार होते. परंतु आपल्या जोडीदाराला मारणाऱ्या बापूच्या पत्नीला ती डसते व आपल्या विधवपणाच्या दु:खाचा बदला बापूला विधुरपण भोगायला लावून घेते.

यातून प्राण्यामध्ये देखील जोडीदाराबद्दल असणारी ओढ, त्याची प्रेमभावना याचे मानवाच्या भावनेशी साधर्म्य आहे हेच दिसून येते.

## शेतीशी संबंधीत कथा -

ग्रामीण भागात शेती हा एकट्याचा धंदा तर नाहीच. पावलोपावली शेतकरी पराधीन असतो. तशात निसर्गाची साथ हुकमी नसते. कधी कधी तर निसर्गाची अवकृपा होते तो अनुकूल असला तर किडे, मुंग्या, पाखरे असतात. त्यांच्या तावडीतून राहील ते पुन्हा चोराचिलटांपासून सांभाळावे लागते. इतका परस्वाधीन असणाऱ्या कुणबी हरिबा शेतकऱ्याची ' राखण ' ही कथा.

हरिबाने दुष्काळातही जोंधळ्याचे पीक नावाजण्यासारखे आणले. हळद, ऊस सोडला व जोंधळा पोसला. गेले तीन महिने हरिबा राबत होता. दुष्काळामुळे अनेकांच्या वाईट नजरा

हरिबाच्या शेताकडे वळत. त्यामुळे हरिबाने दोन मुलांच्या मदतीने जागता पहारा ठेवला. दोन दिवसात तो शेतातील धान्य घरी नेणार होता ; परंतु जवळच्या गावातील मांगांनी बंदोबस्त असूनही हरिबाचे शिवार रात्रीत लुटून नेले.

अजब घटना हाच या कथेचा विषय. मार खाणारे दुष्काळपीडित चोर जसे त्यांच्या कथेत येतात त्याप्रमाणे चोरीमुळे सर्वस्व गमावून बसणारा तालेवारी कुणबी हरिबादेखील त्यांच्या कथेचा विषय बनतो.

' पाषाण ' या कथेत शेतात विहिरीवर राबणाऱ्या गड्याची व्यथा चित्रित झाली आहे. धनाप्पानं विहीर फोडण्यासाठी खंडून घेतली; परंतु रान अतिशय कठीण लागले. गड्यांना त्रास होऊ लागला. यातूनच कष्ट करणाऱ्या लोकांचे दारिद्र्य, विरंगुळा म्हणून तंबाखूच्या तुरट चवीबरोबरचे संवाद आणि रामाचे दारिद्र्य यातून शेतामध्ये कष्ट करणाऱ्या लोकांची व्यथा चारुता सागरांनी मांडली आहे.

## स्त्री दु:खाचे चित्रण करणाऱ्या कथा -

समाजाने स्त्रीला उपभोग्य वस्तू म्हणून तिची अवहेलनाच केली आहे. विविध बंधनात बांधून स्त्रीचे जीवन परावलंबी केले आहे. तिच्या वाट्याला जन्मापासूनच संकटाची मालिका गुंफली आहे. त्यामुळे स्त्रीचे जीवन हा दु:खाचा सागर बनला आहे  तिच्या वाट्याला अनेक दु:खे येतात. या दु:खाचे ओझे घेऊनच ती जगते, सोशिक बनते. काही स्त्रिया बंड करतात या दु:खाविरूद्ध आवाज उठवतात.

' दर्शन ' ही पुतळा जोगतिणीची कथा. घरातील पहिली मुलगी देवीला वाहवी असा त्या घरचा संकेत. पुतळाचं लग्न देवीशी होऊन ती जोगतीण बनली. लग्न म्हणजे काय हेही तिला कळत नव्हतं. पुजाऱ्याबरोबर सक्तीचा एकांत झाला. ती जोगवा मागू लागली. पुढे तिला नाच व गाणे याचे शिक्षण मिळाले. ताफ्याबरोबर ती फिरू लागली. पुरुषांची संगत घडू लागली. दर अडीच- तीन वर्षाने आईकडे जावे, पोट मोकळे करावे हा जणू तिचा नियमच बनला. तीन बारा वर्षे अशीच गेली. तिला तुळसाईचा निरोप आला. तिने आपले उत्तराधिकारीपद पुतळाला दिले. ती महाभक्तीण बनली. तिच्यातली ' ती ' संपली ; पण शेवटपर्यंत तिच्या मनात एक विचार कायम राहिला. आपले जीवन वाया गेले. याची जाणीव झाली व तिने आपल्या गळ्यातील दर्शन भाचीच्या गळ्यात बांधले नाही.

जोगता-जोगतीण बनणारे स्त्री-पुरूष, त्यांच्या व्यथा, तृतीयपंथीय लोकांचे जीवन, समाजाची त्यांच्याकडे पाहण्याची दृष्टी, त्यांच्या जीवनातील मूलभूत समस्या या सर्व गोष्टींचे चित्रण चारुता सागरांनी केले आहे.

' ओटी ' या कथेतील नवीन लग्नं झालेल्या ताईच्या घरी ती माहेरी आली असताना दरोडा पडला. या दरोड्यात तिच्या सर्व जिनसा लुटल्या गेल्या. ही गोष्ट जेव्हा सासरच्या लोकांच्या ध्यानी आली तेव्हा त्यांनी दागिन्यासाठी तिचे नांदणे तोडले गेले. तिच्या वडिलांनी विनवणी केली. एक एक दागिना घालण्याचे वचन दिले पण व्यर्थ. सासरची माणसे माणसापेक्षा व्यवहार जपणारी. दागिन्यासाठी ताईचे नांदणे तुटते. ही तिची व्यथा.

समाजातील दागिन्याचे महत्त्व व त्यासाठी होणारी स्त्रीजातीची फरफट चारुता सागरांनी येथे मांडली आहे.

' बाबा मला क्षमा करा! ' या कथेतील उमाचे सौदर्य व हुंड्यासाठी पैसा यातून तिच्या जीवनात निर्माण होणारे दु:ख या कथेत चित्रित झाले आहे. उमा आपल्या जीवनातील लग्नाचे स्वप्न विसरून जाते. आपला एकुलता एक लग्नाचा भाऊ घरात उपवर बहीण असताना लग्न कसा करेल हे ती जाणते. ती म्हणते, " बाबा, मी घरातील सगळ्यांची अडचण होऊन बसले. माझा देह मला जड वाटू लागला. तुम्ही मला खूप सांभाळल, जीवनमान असेपर्यंत सांभाळाल, पण पुढं काय ? " [१०]

जेमतेम सौदर्यवान असणारी उमा हुंड्याच्या पैशासाठी आपले लग्न होत नाही म्हणून विहिरीत उडी मारते.

' अव्यक्ता ' कथेमधील भीमाचा पती एका रात्री तिला सोडून गेला. ती एकाकी झाली. बापय माणसांच्या घरात रात्र कशी काढायची म्हणून ती शेजारच्या अंतूला बरोबर घेऊ लागली. परंतु पती सोडून गेलेल्या भिमाच्या पोटी गर्भ अंकुर वाढु लागला. तिने एके रात्रीत सासर सोडून माहेर गाठले.

चारुता सागरांनी समाजातील असह्य स्त्रियांच्या पदरी येऊन पडणाऱ्या दु:खांचे चित्रण केलेले आहे.

तुळसा व रत्ना या दोघींच्या संवादातून ' विहीर ' कथेत स्त्रियांच्या दु:खाला वाचा फोडली आहे. तुका मोकाशाच्या कृष्णाला सासुरवासाच्या जाचातून मारून विहिरीत टाकली. या

घटनेनंतर पाण्याला आलेल्या स्त्रिया आपले मन मोकळे करतात. नवऱ्याचं दारूचं व्यसन, त्यातून होणारी मारहाण, परस्त्रीसंग यामुळे होणारा संघर्ष इ. अनेक कारणांनी स्त्रियांचा होणारा छळ व यातून निर्माण होणारे दु:ख चारुता सागरांनी मांडले आहे.

' धुणं ' कथेमध्ये पाणवठ्यावर धुणे धुवायला आलेल्या स्त्रियांच्या संवादातून त्यांचे दु:ख चित्रित केले आहे. ताईसाबांकडे त्या आपल्या मनातील दु:खाचा कप्पा मोकळा करतात. लक्ष्मीच्या लग्नाला तीन वर्षे झाली ; पण तिला माहेरी पाठवली नाई. तिच्या दाल्ल्यानं रताळ सोलल्यावानी पाठ सोललीया. हौसा आजारी आहे; परंतु औषध पाण्याचं नाव नाही ते कधी कुणाच्या जन्माला ठावं नाही. तिची दोरी बळकट असेल तर जगेल. नसेल तर मरेल. तिच्या दैवाची ती. रामू वाण्याची भागू बाळंतीण होऊन दहा दिवस झाले नाहीत तर तिला पाणवठ्यावर धुणं धुवायला यावं लागतं. जैतूनबीला तिच्या सवतीन झिजून मरायचं इक घातलाय. ती दिवसेंदिवस खंगत चाललीया. अशी स्त्री जीवनाची एक ना अनेक दु:खे चारुता सागरांनी चित्रित केली आहेत.

## चारुता सागरांच्या कथेची वैशिष्ट्ये -

चारुता सागरांच्या कथांचा पिंड हा स्वतंत्र मनोवृतीचा आहे. त्यांची कथा ही त्यांच्या अनुभवातूनच प्रकटते. चारुता सागरांनी अशी कसदार कथा लिहिण्याचा सुरूवातीपासूनच ध्यास घेतला. पण त्याकरिता अनुभव हाच प्रमाण मानला आणि अभ्यासांती प्रकटावे हे आपले लेखन क्षेत्रातील ब्रीद मानले. अशा जिवंत अनुभवाच्या ध्यासापोटी पायाखाली येईल ती भूमी ते तुडवत राहिले आणि त्यातूनच आपली अनगड कथा घडवत गेले.

या त्यांच्या कथालेखनाच्या वैशिष्ट्याबाबत विश्वास पाटील म्हणतात, " प्रत्ययकारिता हे तर चारुता सागरांचे महत्त्वाचे वैशिष्ट्य. त्यांच्या कथेतील व्यक्तींचे, प्रसंगाचे किंवा एखाद्या भावक्षणाचे हुबेहुब वर्णन ते करतात. संवादामध्ये व निवेदनामध्येही शैलीभाषेचा वापर त्यांनी केलेला दिसून येतो. त्यांची ग्रामीण भाषाही साक्षात कथानुभव करणारी आहे. त्यांच्या काही कथांचा शेवट अनपेक्षित प्रसंगांनी किंवा नाट्यपूर्ण कलाटणीने ते करतात. त्यामुळे नाट्यत्मकता दिसून येते. उत्तम वर्णने हा वातावरण निर्मितीचा हुकमी उपाय चारुता सागरांच्या कथेत दिसून येतो. त्यांच्या काही कथातून रोमँटिक आविष्काराची पद्धती दिसून येते. ही वैशिष्ट्ये असल्यामुळे चारुता सागरांची कथा ही विविध जीवन दर्शन, मानवी मनाचे दर्शन प्रत्ययकारी

रीतीने, सखोलपणे घडविते. या अनेकविध वैशिष्ट्यांमुळे चारुता सागरांच्या कथेला वरच्या दर्जाची वाङ्मयीन गुणवत्ता प्राप्त होते." [११]

## ग्रामीण परिसराचे वर्णन -

चारुता सागरांचा पिंड घडला तो खेड्यातच. खेड्यातील मातीशी, तेथील शेतजमिनीशी, जमिनीमध्ये राबणाऱ्या प्राण्यांशी त्यांचा घनिष्ठ संबंध आला. त्यांचे दुःख, जगण्याची जिद्द, त्याचे जीवनावर असणारे प्रेम, त्यांचे बारकावे त्यांनी आपल्या कथेत मांडले. त्यांच्या कथेमध्ये येणाऱ्या व्यक्ती, प्रसंग, वातावरण हे ग्रामीण भागातीलच आहे. ग्रामीण भागातील स्त्रियांचे जीवन, त्यांचे कष्ट, जीवन जगण्यासाठी करावा लागणारा संघर्ष, ग्राम जीवनातील चालीरीती यातून स्त्री च्या वाट्याला आलेले दुःख मांडताना तर ही कथा अधिकच कलात्मक पातळीवर जाते.

'नागीण', 'राखण', 'पाषाण' या शेती जीवनाशी संबंधित कथा आहेत. 'राखण' या कथेत अत्यंत कष्टाने शेत पिकवणाऱ्या हरिबाची कथा आहे. 'पाषाण' या कथेत शेतात विहीर काढण्यासाठी कष्ट करणाऱ्या कामगारांची व्यथा आहे. तरी 'नागीण' ही शेतकरी कुंटुंबातील व्यक्तीची कथा आहे. 'भूक', 'बुद्धवाड्यातील भूक' या कथेतून ग्रामीण जीवनातील दलित लोकांची भूकेची समस्या मांडली आहे. 'कुठं वाच्यता नसावी', 'न लिहलेलं पत्र', ' सावित्री ' या कथेतून ग्रामीण भागातील शिक्षकांची व्यथा मांडली आहे. ' दावं ', ' अवर्षण ', 'पूर' या कथेमध्ये ग्रामीण भागात येणाऱ्या दुष्काळ, पूर, रोगराई या नैसर्गिक समस्येमुळे प्राण्याचे व मानवाचे जीवन कसे उध्वस्त होते याचे चित्रण आहे. 'धुणं', 'किंकळी', 'विहीर', 'पेटलेला क्षण', या कथामधुन ग्रामीण जीवनातील स्त्रियांचे जीवन, खेड्यातील चालीरीती, प्रथा, परंपरा, यांच्याशी करावा लागणारा संघर्ष यांच वर्णन आले आहे. 'ढोलगं', 'निवाडा', 'पुंगी', 'वाट', 'रैतुना' इ. कथामधून गावगाड्याशी संबधित डोंबारी, नंदीवाले, सापगारूडी, फासेपारधी, इ. लोकांचे चित्रण आले आहे. 'अंघोळ', 'पूल', 'हॉलिडे होम' या कथांमधील सैनिक हे नागरी संस्कृतीशी संबंधित सीमेवर लढणारे आहेत. परंतु त्यांचा पिंड घडला तो ग्रामीण भागात. ग्रामीण जीवनाशी त्यांचे नाते ठेवून ते पोटासाठी गाव सोडून गेले आहेत म्हणजे या कथाही ग्रामीण जीवनातील तरूणाच्या आहेत. 'दर्शन', 'वाटमारी', 'ओटी' या कथांमधून ग्रामीण भागातील देवदासी, वाटमारी, हुंडा या सामाजिक समस्या मांडल्या आहेत. 'निरोप' आणि

'वर्दी' या दोनच कथा शहरी जीवनाचे चित्रण करणाऱ्या कथा चारुता सागरांनी चित्रित केल्या आहेत.

## अनपेक्षित शेवट -

चारुता सागरांच्या बऱ्याच कथांचे शेवट हे अनपेक्षित होतात. त्यांनी अनेक कथांचे शेवट करीत असताना अचानक कलाटणी दिलेली दिसून येते. यातून वाचक कधी कधी थक्कं होऊन विचार मग्न होतो तर कधी त्याला सुखद धक्का बसतो.

' पेटलेला क्षण ' या कथेतील मालाला तिचा पती भिवा पसंत नाही. तिला संसारात रस नाही. पैसा, सोने, कपडे याची तिला हाव आहे. यातूनच ती वामनबरोबर प्रेमसंबंध जोडते. अन् एके दिवशी त्याच्या बरोबर मुले बाळे सोडून पळून जाते.

भिवा तिचा चार दिवस शोध घेऊन थकतो. अखेर दिवस बुडायला एका शहरात शिरतो. त्याचं त्यालाच वाटू लागलं वाऱ्यावर पसार झालेल्या बाईच्या पाठीमागं आपण धावू लागलोय. कधी सापडेल का ? शेवटी थकून तो गावाबाहेरच्या स्टेशनकडे वळला. रात्र इथं काढावी आणि पहाटे परत फिराव या विचारानं.

धोतराची खोळ करून तो बाकावर बसला. त्याच्या डोक्यातन आता कसला विचार नव्हता. वामन, माली हे सगळ डोक्यातनं निघालं होत, एक पाचऱ्या गाडीला प्रवासी येऊ लागले. आणि अचानक जमिनीतून उगवून स्वप्नात यावी, अशी माला त्याला दिसली. त्यानं हाक मारली. ती तिथल्या तिथं उभी राहिली.

हा इथं कसा! तिच्या पायातल अवसान गळालं. वामन तसाच पुढं झाला; आणि त्यानं दंडाला धरली. गाडी आली. दोन मिनिटं उभी राहिली आणि सुटण्याची शीळ झाली. " कुठायं साला तो वामन्या ? तो किंचाळला नि फरफटत तिला आत आणलं. पण गाडीचा वेग वाढला होता. शेवटचा डबा स्टेशनातून बाहेर पडला होता आणि वामन डब्यातून वाकून मागं पाहत होता. " [१२]

' सावित्री ' या कथेमधील सावित्रीनं आपल्या नवऱ्याला पाहिला तो लग्न मंडपात हळद लावतानाच. त्या वेळी सावित्रीच्या कपाळावर आठया पडल्या त्या कायमच्याच. अनेकांनी तिची समजूत काढली. पोरी, तांदूळ पडल. संपलं. लेकीचा जन्म, दावं लावलं तिकडं जावं; पण तिच्यावर काही परिणाम झाला नाही. तिचं त्याच्यावरनं मन उडालं होतं. एक वेळ तर

सावित्रीनं विहिरीत उडीच घेतली ; परंतु गावातील मास्तरांनी तिला वाचवली. नवरा चार-पाच वेळा येऊन गेला ; पण सावित्री गेली नाही. गावच्या लोकांनी प्रयत्न केला. त्यानां तिनं एकच सांगितल, 'मला साफ नांदाय जायचं नाही. तुम्हाला जर पाठवून द्यायचं असेल तर माझ मडं द्यावं लागेल.'

सासरची माणसं सावित्रीला नेण्यासाठी आली. मास्तरांनी तिची समजूत काढली. सावित्रीला गावाबाहेर पाठवून येणारा गणू नाना म्हणाला, " मास्तर आम्हीच नव्हं गावच्या पोरी-बाळीसुद्धा तुमचा शब्द पाळतात. तुम्ही बोलला, आणि पोरगी मुकाट्यानं उठून गाडीत बसली. अगदी शबूदही बोलली नाही ! " [१३]

' ढोलगं ' कथेतील शेवंतीचे बाबल्याबरोबर लग्न ठरविण्यासाठी तिचा बाप हरण्या तिला बाबल्याच्या पाल्यात घेऊन गेला. मुलगा पसंत पडला; परंतु रात्री बाबल्याच्या खेळ सुरू असताना शेवंतीला मागणी घालणाऱ्या जगण्यानं तार तोडली आणि बाबल्याला एक पाय गुडघ्याखाली कायमचा गमवावा लागला. शेवंती तिचा बाप निराश होऊन माघारी आले. दरम्यानच्या काळात जगण्याने पुन्हा शेवंतीला मागणी घातली. शेवंतीच्या बापाने जड अंत:करणाने त्याला होकार दिला; परंतु शेवंतीने तेजस्वी बाण्याने त्याला नकार दिला व एक दिवस ती बापाला घेऊन बाबल्याकडे आली. तिने त्याला पालात जाऊन उठवले. त्याला उठायला हात दिला. त्याला वाटलं हिला विचारावं, ' हा दिलेला हात कायमचा हाय न्हवं ?' पण लगेच मनात विचार आला, ' आपुन पडलो पांगळं अन् पांगळ्याचं हे ओझं कोण कशाला उरावर घेईल ?'

' येती पुनीव झाल्यावर तांदळाचा बेत करावा म्हणतोय. पोरगी नारळ घेऊन आलोय. एवढं वट्यात घ्या. ' हरण्या म्हणाला.

बाबल्याचा बाप भुजिंगाचा यावर विश्वासच बसेना.

बाबल्या तिच्या खांद्याच्या आधारानं उभा होता. शेवंती आपल्या पदरानं त्याची टिपं टिपत होती आणि आपली गाळत होती.

अशा प्रकारे नाट्यात्मक अनपेक्षित शेवट हे चारुता सागरांच्या कथेचे वैशिष्ट्य आहे. 'नागीण', 'निवाडा', 'पुंगी', 'राखण', 'ओटी', 'रैतुना', 'खेकडा', 'वाटमारी' इ.कथांचे शेवटही नाट्यात्मक चित्रित केले आहेत.

## ओघवते संवाद -

चारुता सागरांची कथा बोली भाषेत प्रकटते. त्या परिसराचे, व्यक्तीचे, घटनेचे चित्रण त्या त्या भाषेत ते जीवंतपणे उभे करतात. यातूनच त्यांची कथा आकारते. उदा. ' कुठं वाच्यता नसावी ' या कथेमधील भिरू चांभाराचा पोरगा एक दिवस शाळेला आला नाही म्हणून मास्तर बोलवायला गेले तेव्हाचा हा संवाद -

" पायात हो, मास्तर ? अनवाणीच हाईसा ? "

" होय, अनवाणीच आहे. मी कधी घातलं नाही, भिरू. पायांना सवय आहे अशी."

" छ्या छ्या" तो हातातली रापी खाली ठेवत म्हणाला, " आमच्या गावचं मास्तर तुम्ही. आणि पायानं असं उघडं ? गावाला जाता-येता तर कसं ? ऊन म्हणून असतं. काटा म्हणून असतो. राच्चं, इरंचं बाहेर पडावं लागतं. माणसाला एक वेळ आन्न नसलं तरी चालंल पर पायाला मातूर पाहिजे." आणि पुढं दोन दिवसानं कोरा करकरीत चपलांचा जोडा घेऊन तो शाळेत आला. माझ्यापुढं टाकला.

" ह्यो घाला मास्तर! "

" भिरू, हे काय ? मी कधी तुला सांगितला होता ? "

" आवं, तुम्ही सांगितलं नसलं म्हणून काय झालं ? आम्ही वळखाय नको ? "

" पर, भिरू .... !"

" मी पैसे नाही मागत तुम्हांस्नी, मास्तर ; देवाच्यान् "

" शपथ आणि कशाला देतोस ? पण तुझ्या कष्टाचं मोल न देता तस्सं घ्यायचं, हे माझ्या हिशेबात नाही बसत. सराव आहे पायाला." [१४]

भिरू व मास्तर यांच्या संवादातून मास्तरांच्या अंतरंगातील विचार जीवंतपणे साकारले आहेत तर गावातील मास्तरांच्याबद्दल भिरूला असणारा ओलावा वरील संवादातून व्यक्त होतो.

चारुता सागर संवादातून तो तो प्रसंग सचित्र डोळ्यासमोर उभा करतात. उदा. 'वर्दी ' या कथेमध्ये गुणवंतरावांच्या दुकानापुढे एक बेवारस प्रेत पडले होते. त्यांनी पोलीसात वर्दी दिली. पंचनामा झाला. पोलीसांनी ' टाका जावा पुरून ' म्हणून सांगितले. गुणवंतराव अवघडून

बसले तोच एक किडकिडीत पोरगेला पुढं येऊन उभा राहिला अन् हलक्या आवाजात म्हणाला, -

" मालक मढं न्यायचं आहे काय ?"

त्यांनी कपाळाचा हात काढून त्याच्याकडं पाहिलं. तो दीन चेहऱ्याचा पोरगा देवासारखा वाटला.

" तुला जमेल एकट्याला ? हे न्यायचं, पुरायचं ?"

" नाही! माझा एक साथीदार आहे ना ? आम्ही नेतो दोघंजण पार मढं घाटाला."

" तो आलाय इथं ? "

" नाही. घेऊन येतो लगेच. तोवर तुम्ही पाहा काय काय लागतयं ते! "

तो गेला. गुणवंतराव मोकळ्या अंगानं उठले. प्रेताभोवतीची गर्दी हटवू लागले.

" मागं सरा. मागं सरा. मेलाय माणूस. त्याला काय बघायचं ? " घडीभरात ते दोघे हजर झाले.

" दोन पोती आणा. खांद्याला दोन वासं आणा. वाक द्या. दावण द्या, तिरडी बांधली पाहिजे. गुलाल, तीन हात कोरं कापड, ऊदकाडी, दोन फुलं. एकेक आणून ठेवा." [१५]

बेवारस प्रेत, त्याच्या अंत्यसंस्काराची तयारी हा प्रसंग करूणाजनक आहे. परंतु त्याचे ओघवते असे सहज संवादातून चारुता सागरांनी वर्णन केले आहे.

' सोबती ' कथेमध्ये एक दिवस पोस्टमन मास्तरांकडे मुक्कामाला आला. मास्तर ज्या घरात राहत होते ते घर जुनाट होते. रात्री झोपण्यापूर्वी दोघांच्या गप्पा रंगल्या पण पोस्टमन बोलता बोलता एकदम थांबला. थोडासा गप्प झाला नि मग म्हणाला, " मास्तर ऐकलं का ?"

" काही नाही. "

" अहो ते ऐका की ----" त्यानं इशारा केला.

" कसला आवाज येतोय ?"

चिऽऽप, चिऽऽप, चिऽऽप .....

आवाज चिपचिपत होता.

" मास्तर, एकला का कशाचा आवाज आहे तो. "

" नाही बा. "

" अहो हा त्याचा आवाज आहे."

"कशाचा"

" संध्याकाळी त्याचं नाव घेऊ नये."

" म्हणजे ?"

" ऐका तर ! "

मी ध्यान देऊन ऐकू लागलो.

आवाज चिपचिपत होता.

" मास्तर, जनावर मोठं आहे. आपण झोपू या." [१६]

चारुता सागरांनी संवादातून प्रसंग उभे केले आहेत. त्यांची भाषा ही त्या त्या प्रसंगाशी एकरूप झालेली दिसून येते. यातूनच त्याच्या लेखणीला जीवंतपणाचा घाट प्राप्त झाला आहे.

## आटोपशीर, यथार्थ वर्णने -

आटोपशीरपणा हे चारुता सागर यांच्या कथेचे आणखी एक वैशिष्ट्य आहे. त्यांच्या कथेत कोठेही पाल्हाळ नाही. सुरुवात, मध्य, शेवट असा बांधेसूदपणा त्यांचे कथेत दिसून येतो. या रचनेत देखील विविधता दिसून येते; परंतु ही विविधता मांडताना कोठेही कथा पसरट झालेली जाणवत नाही. ' दर्शन ' सारख्या कांदंबरीचा विषय असणारी कथा अत्यंत आटोपशीर आहे. कथेतील पात्रे, प्रसंग, वर्णने यांची मांडणी आटोपशीर आहे.

आटोपशीरपणाबरोबरच यथार्थ वर्णन हे देखील चारुता सागरांच्या कथेचे वैशिष्ट्य आहे. व्यक्ती, प्रसंग व निसर्ग यांचे यथार्थ वर्णन ते करतात. त्यामुळे त्यांची कथा आकर्षक ठरते. त्यांच्या वर्णनात चित्रात्मकता दिसून येते. उदा. ' ढोलगं ', कथेतील शेवंता या नायिकेचे वर्णन - " शेवंती पातरीच्या भाजीवानी कवळी, रंगानं सावळी, पण कायेनं तुकतुकीत." [१७]

'झोळी' कथेतील अर्जुनचे वर्णन - " काळाकभिन्न फत्तरासारखा काळा आणि धिप्पाडच्या धिप्पाड. भल्या मोठ्या दैत्यासारखा. येथून तेथून उघडा. अपवादासाठी ढुंगणास एक लंगोटी

जुन्या मळक्या धडप्याची, कमरेला करंगळी इतका मोठा वाकाचा दोर ; करदोरा म्हणून बांधलेला. खांद्यावर एक फाटकी घोंगडी, त्याच्या पुढच्या बाजूला गाठ मारून खोळ केलेली." [१८] अशा प्रकारे ते यथार्थपणे व्यक्तिचित्र साकारतात.

चारुता सागरांनी प्रसंगचित्रेही हुबेहूब रेखाटली आहेत. उदा.- 'आईचा मृत्यू' या कथेतील आईच्या मृत्यूनंतर मातीच्या दिवसाचे वर्णन - " तिसरा दिवस. पै पाव्हणं, तिचं खांदकरी. दहा वाजेपर्यंत एकेक जमली. अण्णानं चौफेर नजर फिरवली. " आली का सगळी ? का आणखी कोणी यायचं आहे ? चला, आता उशीर नको." दोघांतिघाचा आवाज. माणसं उठली. कपडे काढले. डोकीला टापरी गुंडाळली नि निमुटपणं स्मशानाकडे निघाली. मसनवटा वस्तीपासून मैलभर होता. नदीकाठावर. पण तिथं कोण होतं ? पाटीभर चिताभस्म. त्याच पूजन केलं. जीव तिथं राहतो म्हणे झाडावर तीन दिवस. निवद दावला. कावळा पटकन शिवला." [१९]

चारुता सागरांनी प्रसंगचित्रे अत्यंत बारकाव्याने रेखाटली आहेत. त्याप्रमाणे निसर्गवर्णनेही त्यांनी सूक्ष्म अशा निरीक्षणातून मांडली आहेत उदा. ' पाषाण ' या कथेमधील निसर्गवर्णन. -

" तासाभरात दिवस मोहरला. हळूहळू वर आला. चैत्रपालवीसारखी प्रसन्न सकाळ सभोवार पसरली. पानकोंबडे ओरडाय लागले. कावळ्यांच थवे आकाशातून ओरडत चालले. ल्हावर पक्ष्यानं आपलं घरटं सोडलं. भोरड्याचा थवा उडून गेला. दिवाभीतानं आपलं तोंड लपवून घेतलं. सशाची पिलावळ बिळातून कोवळ्या उन्हात बसली. आणि दहा-बारा बळी वावरात येऊन बसले. नांगरलेल्या जमिनीतून निघालेली किडामुंगी वेचू लागले. " [२०]

अशा प्रकारे चारुता सागरांनी व्यक्तिचित्रे, प्रसंगचित्रे व निसर्गचित्रे याचे अत्यंत बारकाव्यांनी त्यांच्या सर्व बारीक-सारीक हलचालीसह हुबेहुब वर्णन केले आहे.

## कलात्मक रचना -

चारुता सागरांच्या कथांचे वैशिष्ट्य म्हणजे तिची रचना कलात्मक आहे. सुरुवात, मध्य, शेवट असा सरळ साधेपणाचा मार्ग तर त्यांनी स्वीकारलाच परंतु कथारचनेत वेगळेपणाही आणला. काही कथा पूर्वलक्षी निवेदन पद्धतीचा वापर करून लिहिल्या आहेत. यामुळे त्या उठावदार बनल्या आहेत व कथेची उत्कंठा वाढली आहे. उदा. ' ढोलगं ', ' वाट ', ' दर्शन ',

' रैतुना ' या कथांमध्ये सुरवातीलाच समस्या मांडली आहे. त्यामुळे उत्सुकता वाढली आहे. काही कथांच्या रचनेसाठी पात्रमुखी निवेदन पद्धतीचा वापर केला आहे. उदा. ' सोबती ', ' बाबा, मला क्षमा करा! ', ' कुठं वाच्यता नसावी ', ' न लिहलेल पत्रं ' इ. त्यामुळे या कथा यशस्वी झाल्या आहेत. काही कथांचे निवेदन स्वत: लेखकच करतात. म्हणजेच चारुता सागरांनी कथेला अनुसरून कथा रचनेच्या तंत्रात विविधता आणण्याचा प्रयत्न केल्याने त्याची कथा वेगळे अस्तित्व निर्माण करते.

## निवेदन आणि संवाद : स्वतंत्र भाषाशैली

चारुता सागरांच्या ' नागीण ', ' नदीपार ', ' मामाचा वाडा ' या कथासंग्रहामध्ये आटपाडी, जत, सांगोला ते मिरज या प्रदेशातील बोलीने जिवंत झालेली शैलीदार पण अकृत्रीम अशी भाषाशैली प्रत्येक कथेमध्ये दिसून येते.

ज्या ज्या भू-भागातील कथांचे कथानक आहे त्या भागातील लोकांच्या भाषेचे प्रतिबिंब त्यांच्या लेखणीतून प्रकटते. उदा. ' आंघोळ ' ही सैनिकांच्या जीवनावरील कथा यातील हे वर्णन -

" रोलकॉल अटेन्शन! " बुटांचा आवाज एकसाथ खडाडला. हवालदार मेजरने कमविलेल्या कॅडन्सचा हा प्रभाव. एका शब्दानं आख्खं रेजिमेंट 'अटेन्शन ' करायचं. नाही तर कित्येक ऑफिसर्सना साधं ' डी अटेन्शन ' ही म्हणता येत नाही. मुखातन उगीच बुळबुळीत आवाज. सैनिकांनी आपणहूनच अटेन्शन व्हावं. अधिकाऱ्यांची आद राखावी.

नेपोलियनसारखी मेजर भाटियाची ठेंगू मूर्ती. नेहमी सज्ज, आघाडीवर सदा पुढं. रिपोर्ट घ्यायला रोल कॉलवर ते आले होते. हवालदार मेजरने समोर जाऊन सॅल्यूट केला.

" ओ.के ? "

" ओ.के. साब! "

" तो डिसमिस करो! "

हवालदार मेजरने परत सॅल्यूट केला नि रोलकॉल डिसमिसची ऑर्डर दिली. [२१]

' वाट ' कथेमधील फासेपारधी समाजातील कावरी आपल्या वय झालेल्या आजारी आईला सांगावा मिळताचा भेटायला निघाली तिनं दंडोबाच्या डोंगररांगात आपल्या भावची जखऱ्याची वस्ती शोधली तिचे वर्णन चारुता सागर पुढीलप्रमाणे करतात.-

" पाल उतरल्याच्या खाणाखुणा दिसल्या. चूल, चूलीची दगडं, मारलेल्या पाखरांची पखं, जनावरांची हाडं, पायाखालची गवत काढलेली जागा, फाशाच्या मोडक्या खुट्या, कामट्या आणि पालाच्या मेखा उपसलेल्या भेगा. त्या पलीकडं ठोकलेल्या देवाच्या पताका, सगळ्या खुणा साजिवंत. जशाच्या तशा. " [२२]

अशा प्रकारे चारुता सागर त्या त्या लोकांचे तेथील वातावरणाचे, परिस्थितीचे वर्णन स्वतंत्र भाषाशैलीतून मांडतात. त्याचबरोबर त्यांची भाषा ही यमकप्रधान व छोटी - छोटी वाक्ये धारण करून प्रकटते. त्यामुळे भाषेला एक वेगळाचा गोडवा प्राप्त झाला आहे. उदा. पोटात तहान तहानेला पीत होती. आतडी आतड्याला खात होती. पाय पायाला थटत होते.(दावं) ; शेवंती पातरच्या भाजीवानी कवळी, रंगान सावळी, पण कायेनं तुकतुकीत (ढोलगं) अशा प्रकारे छोटी वाक्ये आणि यमक प्रधान रचनेमुळे गोडवा निर्माण झाला आहे.

चारुता सागरांची कथा ग्रामीण मातीतूनच जन्मते. त्यामुळे ती तेथील बारीक-सारीक बारकावे देखील घेऊनच प्रकटते. उदा. ग्रामीण भागात शिव्याचा वापर सर्रास केला जातो. हारामखोर (राण्याबेरड); टवळे (किंकाळी); साला (पेटलेला क्षण ); कवा यांच्या रांडा रंडक्या होतील (रंगरूट); रांड (मामाचा वाडा); ' ए, गिदांनो, तुम्हांला घातलं म्हाराच्या गाडग्यात' (म्हसं); मादरच्योद (भूक) इ. त्याबरोबर त्यांच्या भाषेतून वाक्यप्रचारांचा देखील वापर झालेला दिसतो. उदा.- वर्दी देणे, झुलवा लावणे, नजर न ठरणे, डोळे फाडून बघणे, मन घट्ट करणे, ऊर फाटावासा आनंद होणे, जिवाला हाक नाक मुकणे, आवाक होणे, वाचा जाणे, हात आखडता घेणे, गहिवरून येणे इ.

त्याचबरोबर त्यांच्या ' रैतुना ', 'नदीपार '. ' आंघोळ ' या कथामध्ये हिंदीभाषेचा ही वापर झालेला दिसून येतो. उदा.-

" सायेबा, नीचे उतर रे, उतरा क्या ?" तो उतरत नाहीसा पाहून त्यानं पुन्हा आवाज दिला. " ठेर ठेर वहाँच ठेर. मैं आता हू उप्पर, तुझे उतरना नही आयेगा. तू नीचे जायेगा." [२३]

' रैतुना, कौन आया, ग ? '

' कौन नहीं, गे! यहाँ का पटेल है, पटेल.'

' तो तुम्हारा नाम रैतुना है ?'

' हां ........ '[२४]

अशा प्रकारे चारुता सागरांनी स्वतंत्र भाषाशैलीचा वापर केला आहे.

## समारोप -

चारुता सागरांच्या कथांचे स्वरूप पाहता त्यांनी विविध विषयावर कथालेखन केल्याचे जाणवते. त्याचे अफाट आणि अमर्याद फिरणेच या विविधांगी कथालेखनाला कारण आहे. कन्याकुमारी ते काश्मीर असा सबंध मुलूख त्यांनी पायी घातला. यातूनच त्यांची कथा आकारते. चारुता सागर सैनिक, शिक्षक, भटकंती करणारे डोंबारी, नंदीवाले, रोहिले, गारूडी इ. लोकांच्या जीवनावर कथा लिहितात. त्याप्रमाणे भुकेची वेदना तीव्रतेने मांडतात. तसेच नैसर्गिक समस्येतून उध्वस्त होणारे मानवी जीवनही रेखाटतात. ग्रामीण भागात शेत जमीनीत तसेच गावातही सापांची संख्या मोठी आहे. यातून घडणारे प्रसंग देखील त्यांच्या कथेचे विषय झाले आहेत. ग्रामजीवन हे पूर्णता शेतीशी संबंधित आहे. शेतीमध्ये करावे लागणारे कष्ट, पिकाची राखण, त्यातून होणाऱ्या चोऱ्या हे ही त्यांच्या कथेचे विषय झाले आहेत. त्याचबरोबर ग्रामीण भागातील स्त्रीजीवन हे अत्यंत दयनीय आहे. या स्त्री दु:खाचे चित्रणही त्यांच्या कथेचे विषय झाले आहेत. अशा प्रकारे ग्रामजीवनातील विविधांगी विषयावर कथालेखन करणे हे चारुता सागरांच्या कथेचे स्वरूप आहे.

चारुता सागरांच्या कथांचा पिंड हा स्वतंत्र मनोवृत्तीचा आहे. त्यामुळे त्यांच्या कथेची स्वतंत्र अशी वैशिष्ट्ये जाणवतात. ग्रामीण परिसर तेथील पशु पक्षी, बलूतेदार, अलूतेदार यांचे अत्यंत बारकावे घेऊन ग्रामीण जीवनाशीच नाते सांगणारी त्यांची कथा आहे. चारुता सागरांच्या कथेचे अनपेक्षित शेवट हे वैशिष्ट्य आहे. त्यांच्या अनेक कथांचे शेवट अचानक कलाटणी देणारे आहेत. कधी-कधी सुखद धक्का तर कधी वाचकाला विचारमग्न करतात. त्याचबरोबर त्यांची संवादाची ओघवती निवेदन पद्धती  यातून कथा सहज पुढे पाऊल टाकते, परंतु ती वाहत जात नाही. त्याच्या कथेचे आटोपशीरपणा व यथार्थ वर्णने ही देखील वैशिष्ट्ये दिसून येतात. चारुता सागरांनी भटक्या लोकांची जाणीवेने व जीव्हाळ्याने मराठी वाचकांना ओळख करून दिली हे त्यांच्या कथेचे वेगळे वैशिष्ट्य आहे याबाबत गो.मा.पवार म्हणतात -

" दलित भटक्यांच्या जीवनावरील त्यांच्या कथांत आपल्याला दोन विशेष जाणवतात. एक विविध जातीची निव्वळ समाजशास्त्रीय पातळीवरची जी माहिती मिळते ती थक्क करून टाकते. कारण आपल्या पांढरपेशांचे जग आणि भटक्या विमुक्तांचे जग ही दोन जगे भिन्न आहेत. आपण त्यांना वरवर पाहतो. त्यांच्या जीवनाचे भेदक व अस्वस्थ करणारे ज्ञान आपल्याला या कथातून होते. चारुता सागर यांच्या कथांचा दुसरा विशेष म्हणजे ह्या कथातून दलितांच्या व भटक्या विमुक्तांच्या जीवनातील कारूण्य अत्यंत वास्तववादी आणि तरीही नाट्यात्म पद्धतीने पकडण्याची हातोटी. म्हणून त्यांच्या कथांना कलात्मकताही लाभलेली आहे. " [२५]

आतापर्यंत आपण चारुता सागरांच्या ग्रामीण कथेची स्वरूप व वैशिष्ट्ये यांची चर्चा केली. आता यापुढील प्रकरणात चारुता सागर आपल्या कथांमधून स्त्रीजीवनाचे चित्रण कशाप्रकारे करतात ते पाहू.

## प्रकरण पहिले

## संदर्भ


१.महाजन वैजनाथ : चारुतांचा कथासागर, पुढारी दिवाळी अंक २००५, पृष्ठ १२२.

२. चारुता सागर : 'हॉलिडे होम', मामाचा वाडा, मॅजेस्टिक प्रकाशन, प्रथमावृत्ती, मार्च १९८६, पृष्ठ ९२.

३. चारुता सागर : 'असेही दिवस', नागीण, मॅजेस्टिक प्रकाशन, तिसरी आवृत्ती, १९९१, पृष्ठ १६१.

४. टिळक अविनाश : चारुता सागर : एक विलक्षण ताकदीचा कथ कार दै.लोकमत (हॅलो सांगली) पृष्ठ २.

५. चारुता सागर : 'निवाडा', नागीण, मॅजेस्टिक प्रकाशन, तिसरी आवृत्ती, १९९१, पृष्ठ ९५,९६

६. जोंधळे महावीर : स्त्रियांचे चिरेबंदी दु:ख, दै लोकमत-संपादकीय, १ डिसेंबर २००१, पृष्ठ ४.

७. चारुता सागर : ' न लिहलेलं पत्रं ', नागीण मॅजेस्टिक प्रकाशन, तिसरी आवृत्ती, १९९१, पृष्ठ ८१.

८. चारुता सागर : ' सावित्री', नदीपार, रोही प्रकाशन, प्रथमावृत्ती, २ मे १९७६, पृष्ठ ८८.

९. चारुता सागर : 'वर्दी ', नागीण, मॅजेस्टिक प्रकाशन, तिसरी आवृत्ती, १९९१, पृष्ठ ७१.

१०.चारुता सागर : 'बाबा मला क्षमा करा! ', मामाचा वाडा, मॅजेस्टिक प्रकाशन, प्रथमावृत्ती, मार्च १९८६, पृष्ठ ७८.

११.पाटील विश्वास : चारुता सागरांच्या कथालेखनाचे विशेष - शिवाजी विद्यापीठाला सादर केलेला अप्रकाशित एम.फिल. प्रबंध १९९२, पृष्ठ १६३, १६४.

१२. चारुता सागर : 'पेटलेला क्षण', मामाचा वाडा, मॅजेस्टिक प्रकाशन, प्रथमावृत्ती, मार्च १९८६, पृष्ठ १२.

१३. चारुता सागर : ' सावित्री ', नदीपार, रोही प्रकाशन, प्रथमावृत्ती, २ मे १९७६, पृष्ठ ९५.

१४. चारुता सागर : ' कुठं वाच्यता नसावी ', नागीण, मॅजेस्टिक प्रकाशन, तिसरी आवृत्ती, १९९० पृष्ठ १६.

१५. चारुता सागर : 'वर्दी ', नागीण, मॅजेस्टिक प्रकाशन, तिसरी आवृत्ती, १९९१, पृष्ठ ६३.

१६. चारुता सागर : ' सोबती ', नदीपार, रोही प्रकाशन, प्रथमावृत्ती, २ मे १९७६, पृष्ठ ११०.

१७. चारुता सागर : ' ढोलग ', नागीण, मॅजेस्टिक प्रकाशन, तिसरी आवृत्ती, १९९१, पृष्ठ ५०.

१८. चारुता सागर ' झोळी ', नदीपार, रोही प्रकाशन, प्रथमावृत्ती, २ मे १९७६, पृष्ठ ३१.

१९. चारुता सागर : 'आईचा मृत्यू', नदीपार, रोही प्रकाशन प्रथमावृत्ती, २ मे १९७६ पृष्ठ ६७.

२० चारुता सागर : ' पाषाण ', मामाचा वाडा, मॅजेस्टिक प्रकाशन, प्रथमावृत्ती, मार्च १९८६, पृष्ठ १०१.

२१. चारुता सागर : ' अंघोळ ', नागीण, मॅजेस्टिक प्रकाशन, तिसरी आवृत्ती, १९९१, पृष्ठ ३९, ४

२२. चारुता सागर : ' वाट ' नागीण, मॅजेस्टिक प्रकाशन, तिसरी आवृत्ती, १९९१, पृष्ठ १२०.

२३. चारुता सागर : ' नदीपार '- नदीपार, रोही प्रकाशन, प्रथमावृत्ती, २ मे १९७६, पृष्ठ १६३.

२४. चारुता सागर : ' रैतुना ', मामाचा वाडा, मॅजेस्टिक प्रकाशन, प्रथमावृत्ती, मार्च १९८६, पृष्ठ ३१.

२५. पवार गो.मा. : 'चारुता सागरांची कथा', बंद दरवाजा, दिवाळी अंक ऑक्टोंबर १९८६, पृष्ठ ६.